# मराठी साप्ताहीक पोलीस पत्रिका
# कार्यालय पोलीस अधीक्षक
# नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर

अ.क्र. 29 दिनांक 15.07..2024 ते 19.07.2024 ( भाग 1 ते 5 )


## भाग –1 (नियुक्ती,निवृत्त,बदली,पदोन्नती)

१) कमांकः–नाजिया / डी–9–बी / मृतक पोशि / 2046 काळे / 7112 / 2024 नागपुर दिनांकः– 16 / 07 / 2024

–:आदेश:–

पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा (ग्रामीण) नागपुर यांचे आस्थापनेवरिल खालील नमुद पोलीस अंमलदार यांचे निधंन झाले असल्याने त्यांचे नावासमोर नमुद केलेल्या दिनांकापासुन त्यांचे नांव या जिल्हयाचे आस्थापनेवरुन कमी करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पोलीस अंमलदाराचं नांव व हुद्या | नेमणुक | मृत्यूचे कारण | मृत्यु दिनांक | आस्थापनेवरुन नांव कमी करण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | दिवंगत पोशि / २०४६ ईश्वर शिवाजी काळे | पोलीस मुख्यालय नागपुर ग्रामीण | मोटार सायकल स्लीप होवुन अपघती निधन | ०४.०६.२०२४ | ०४.०६.२०२४ |

**२)क्रमांक :-पोअनाजिग्रा डी-९ सी / नावात बदल /मपोहवा-१८६८/ ११६४३५० /२०२४ दि. / ७/२०२४**

**:- आदेश -:**

पोलीस अधीक्षक ,नागपूर जिल्हा (ग्रामीण ) नागपूर या आस्थापनेवर कार्यरत असलेले खालील महिला अंमलदार यांच्या विनंतीवरुन तसेच त्यांनी सादर केलेल्या कागदपत्राच्या आधारे (महाराष्ट्र शासन राजपत्रात) धारण केलेल्या नवीन नावाची नोंद शासकीय अभिलेखामध्ये सुधारणा करण्यांची मंजुरी देण्यांत येत आहे .

| अ.क्र. | सध्या सेवापुस्तकात असलेले नाव /पदनाम /ब.न . | नेमणूक | राजपत्रात नमूद केल्याप्रमाणे सेवापटामध्ये नावात बदल करावयाची विनंती | महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक व पुष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १. | मपोहवा/१८६८ स्मिता पुरुषोत्तम पाल | खापरखेडा | स्मिता बादल काशी | रजि.नं.NPCTTY/२३६/२०१५-१७,वर्ष २,अंक ओ (१०) मार्च ३.९.२०१६फाल्गुन १३-१९ शके १९३७(**N-१५६९२१**) |

3) क्रमांकःनाजिग्रा / डि–9 / पोशि.–2014 / जांभुळकर / नियुक्ती आदेश / 7150 / 2024 नागपूर, दिनांक :– 16 / 07 / 2024

–::आदेश::–

महाराष्ट्र शासन, गृह विभाग यांचे पत्र क्रमांक न्यायप्र 1815 / प्र.क्र.441 / पोल–5, दिनांक 09 / 02 / 2024 अन्वये श्री. सुनिल शंकरराव जांभुळकर यांना जिल्हाधिकारी, नागपूर यांनी केलेल्या शिपारशीच्या अनुषंगाने पोलीस शिपाई पदावर नियुक्ती देणे योग्य ठरेल असे निर्देश शासनाने दिलेले आहेत.

त्याअनुषंगाने नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर या आस्थापनेवर घेण्यांत आलेल्या पोलीस शिपाई भरती – 2014 च्या भरतीमध्ये आपल्या नांवासमोर दर्शविण्यांत आलेल्या सामाजिक व समांतर आरक्षण प्रवर्गात निवड करण्यांत आली असल्याने आपली नवप्रविष्ठ पोलीस शिपाईया पदावर कर्तव्यावर हजर झाल्याचे तारखेपासून पुढील अटी व शर्तीचे अधीन राहुन महाराष्ट्र शासन यांचे राजपत्र असाधारण भाग 4 अ,दिनांक 30 / 01 / 2019 अन्वये पोलीस शिपाई पदाची सुधारीत वेतन संरचना एस–7 मध्ये वेतनश्रेणी रूपये 21700–69100 नुसार 21700 / –अधिक विशेष वेतन रू.750 / –या वेतनावर (इतर अनुज्ञेय भत्यासह)तात्पुरती व अस्थायी स्वरूपात नियुक्ती करण्यांत येत आहे.

सदर आदेशातील नमुद उमेदवार खालील अटी व शर्ती मान्य असल्यास, त्यांनी नियुक्ती आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून पोलीस मुख्यालय,नागपूर ग्रामीण जिल्हा नागपूर येथे आवश्यक किट साहित्य,गणवेष व पुरेसा मेस अग्रीमासह न चुकता या आदेशान्वये केलेल्या नियुक्तीवर हजर राहावे. व ते नियुक्तीवर हजर न झाल्यास त्यांची नियुक्ती रद्द करण्यांत येईल व भविष्यात या नियुक्तीवर त्याचा / तिचा कोणताही दावा / तक्रार राहणार नाही, याबाबत नोंद घ्यावी.

| चेस्ट क्रमांक | उमेदवाराचे संपूर्ण नाव | लिंग | जात /प्रवर्ग | नियुक्ती प्रवर्ग | समांतर आरक्षण |
|---|---|---|---|---|---|
| 2111 | सुनिल शंकरराव जांभुळकर | पुरुष | कुणबी /इ.मा.व | इ.मा.व | प्रकल्पग्रस्त |

अटी व शर्ती खालील प्रमाणे

1)नाव,जन्मतारीख,पुर्व चारित्र्य पडताळणी, शैक्षणिक पात्रता,वाहन चालक परवाना,जात व जात वैद्यता प्रमाणपत्र सामाजिक/समांतर आरक्षणाचा लाभ घेण्याकरीता आवश्यक असणारी प्रमाणपत्रे तपासणीचा अधिन राहुन नियुक्ती देण्यास येत आहे. सदरचे प्रमाणपत्रे तपासणी अंती ग्राहय आढळुन आले नाही तर नियुक्ती रद्द करण्यात येईल व आपला कोणताही दावा राहणार नाही.तसेच कोणतीही वस्तुस्थिती निदर्शक माहिती दडवुन ठेवल्याचे अथवा खोटी माहीती दिल्याचे आढळुन आल्यास/वैद्यकीय तपासणीत/चारित्र्यपडताळणीत अपात्र ठरल्यास किंवा उमेदवाराने पोलीस भरती प्रक्रियेमध्ये गैरप्रकार केला होता असे भविष्यात निष्पन्न झाल्यास निवड करण्यात आलेल्या उमेदवाराची निवड रद्द करण्याचा अधिकार कार्यालयास राहील, याबाबत उमेदवाराने नोंद घ्यावी.

2)पोलीस दलात सेवेच्या अनुषंगाने योग्यता व पात्रता तपासणीसाठी उमेदवारांची पोलीस प्रशिक्षण विद्यालयामध्ये मानसिक चाचणी(च्लबीवसवहपबंस ज्मेज) घेण्यात येईल.सदर चाचणीत उमेदवार अपात्र ठरल्यास त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

3)पोलीस अंमलदार (शिपाई) या पदावर नियुक्ती केलेल्या उमेदवाराना मुंबई पोलीस कायदा 1959, मुंबई पोलीस ( शिस्त व अपिल ) नियम 1956 व राज्य शासनाने वेळोवेळी विहीत केलेले सर्व नियम लागू राहतील.म्हणजेच प्रशिक्षण सेवा काळात त्यांची वर्तणुक चांगली व समाधानकारक नसल्यास त्यांना कोणतीही पुर्वसुचना न देता तात्काळ सेवेतुन कमी करण्यांचे अधिकार नियुक्ती अधिकारी यांना राहील.

4)महाराष्ट्र शासन ,सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्र.मभाप–1087/14/सिआर–2/87/20 दिनांक 30/12/1987 अन्वये प्रसिध्द करण्यांत आलेल्या अधिसुचनेमध्ये नमुद नियम 4 मध्ये नमुद शर्तीची पुर्तता न करणा–या उमेदवारास सदर शासन निर्णयानुसार एतदर्थ मंडळाची मराठी/हिंदी परिक्षा उत्तीर्ण करणे बंधनकारक आहे.

5) त्यांची पोलीस शिपाई पदावर नियुक्ती झाली असल्याने ते कार्यकारी पोलीस दलात बदलीसाठी पात्र असणार नाहीत.मात्र, ते विनंतीनुसार जिल्हयाच्या बाहेर फक्त इतर पोलीस घटकात त्याच पदावर आंतरजिल्हा बदलीच्या तरतुदीनुसार 8 वर्षानंतर बदलीसाठी पात्र राहतील.

6)पोलीस अंमलदार (शिपाई) या पदावर नियुक्ती केलेल्या उमेदवारास या पदासाठी विहित केलेले प्रशिक्षण पुर्ण करावे लागेल. व संबधीत परीक्षा चार संधी मध्ये उतीर्ण व्हावे लागेल जर चार संधीमध्ये ते संबधीत परिक्षा उतीर्ण झाले नाही तर त्यांची/तिची सेवा समाप्त करण्यात येईल. या कालावधीत वार्षीक वेतनवाढी त्यांना अनुज्ञेय असणार नाही.

7) उमेदवारांचे नांव, जन्म तारीख, वय, उंची/छातीचे मोजमाप याबाबत काही तफावत आढळून आल्यास तसेच चारित्र, पुर्वचारित्र तपासणी, शैक्षणिक पात्रता,जातीचे प्रमाणपत्र,जात वैधता प्रमाणपत्र,इत्यादी कागदपत्राची छाननी केल्यानंतर अथवा भविष्यात काही आक्षेपार्ह आढळून आल्यास नियुक्ती दिलेल्या उमेदवारास तात्काळ सेवेतुन कमी करण्यांत येईल व त्यांचे विरूध्द फौजदारी स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यांत येवून त्यास शासकीय नौकरीस अपात्र असल्याचे घोषित करण्यांत येईल.

8)देण्यांत आलेली नेमणुक ही तात्पुरत्या स्वरूपाची असून 3 वर्षाच्या आंत कोणतीही आक्षेपार्ह बाब आढळून आल्यास कारणेदाखवा नोटीस न देता अथवा कोणतीही पुर्वसुचना न देता आपणास तात्काळ सेवेतुन कमी करण्यांचे अधिकार नियुक्ती अधिकारी यांना राहील.

9) उमेदवारास मुख्यालय तसेच प्रशिक्षण विद्यालयात 9 महिण्यापर्यन्त प्रशिक्षणार्थी पोलीस अंमलदार (शिपाई) म्हणुन पाठविण्यात येईल. प्रशिक्षण काळात त्यांची वागणुक, शिस्त समाधानकारक आढळुन नआल्यास व प्रशिक्षण काळात अनाधिकृतपणे गैरहजर राहील्यास कोणतीही पुर्व सुचना न देता त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

10)नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवारास महाराष्ट्र शासन ,सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्र.अनियो–1005/126/ सेवा–4 दिनांक 31/10/2005 नुसार नविन परिभाषीत अंशदान निवृत्ती योजना लागु राहिल. त्यांना दिनांक 01/11/2005 पुर्वी अस्तीत्वात असलेली निवृत्ती वेतन,निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागु राहणार नाही. त्यांना राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना (एनपीएस) लागू राहील.

11) नियुक्त केलेल्या उमेदवारास शासनाने विहीत केलेली सर्व शपथपत्रे व प्रतिज्ञापत्रे सादर करावी लागेल,

12) महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम 2005 मधिल तरतुदी नुसार उमेदवारांना नमुना 'अ' या विहीत नमुण्यात लहान कुटुबासंबधिचे प्रतिज्ञापत्र देणे बंधणकारक आहे, त्यानुसार नियुक्ती करण्यात आलेल्या उमेदवाराकडील हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक 28/3/2005 नंतर जन्माला आलेले मुलामुळे आपण नियुक्त झालेल्या पदासाठी अपात्र ठराल, त्याचप्रमाणे सध्या अविवाहीत उमेदवार विवाहीत झाल्यावर त्यांचेकडील हयात मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक झाल्यास सदरहु उमेदवार देखील नियुक्त करण्यात आलेल्या पदासाठी अपात्र ठरतील,

13) आपण कर्तव्यावर हजर होतांना आपले मुळ प्रमाणपत्र तसेच 2 संच छायांकित प्रती साक्षांकीत करून सोबत घेवून यावे.

14) कर्तव्यावर रूजू होणेसाठी कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता देय राहणार नाही.

15) त्यांना नियुक्तीनंतर महाराष्ट्र नागरी सेवा(सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसूचना,शासन निर्णय,परिपत्रके व शुध्दीपत्रकांमधील तरतुदी बंधनकारक राहतील.

16)महाराष्ट्र शासन गृह विभाग पत्र क्र.पीसबी–0311/प्र.क्र.521/पोल–5अ दिनांक 26/09/2011 नुसार पोलीस शिपाई पदावर निवडझालेल्या उमेदवारानी प्रशिक्षण कालावधी अथवा प्रशिक्षण सपल्यानंतर पुढील तिन वर्षात पोलीस शिपाई या पदावरील नौकरीचा राजीनामा दिल्यास वा सदर पदावरून कार्यमुक्त करण्यात विनंती केल्यास अशा उमेदवाराकडुन प्रशिक्षणावर झालेला खर्च , प्रशिक्षण कालावधीत त्यांना अदा केलेल्या वेतन, भत्तासहीत वसुल करण्यात येईल. याबाबतचे बंधपत्र ( बॉन्ड/हमीपत्र ) सदरचा आदेश प्राप्त झाल्यानंतर पोलीस मुख्यालय,नागपूर ग्रामीण जिल्हा नागपूर येथे हजर होते वेळेस भरून देणे आवश्यक व बंधनकारक राहील.

17) नियुक्ती आदेश दिलेल्या उमेदवारास दिनांक /07/2024 रोजी 10.00 वाजता पोलीस मुख्यालय,नागपूर जिल्हा (ग्रामीण) ,नागपूर येथे रुजू व्हावे लागेल. विहीत मुदतीत उमेदवार नेमणुकीवर रूजू झाले नाही. तर ते ही नियुक्ती स्विकारण्यास तयार नाही असे समजण्यात येईल त्यानंतर त्यांचा या नेमणुकीवर कोणताही हक्क राहणार नाही.

18) पोलीस शिपाईया पदावर नियुक्त केलेल्या उमेदवारांनी संगणक ज्ञानाची किमान अर्हता नियुक्तीचे वेळी धारण करीत नसल्यास अशा उमेदवारास सदर अर्हता शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग पत्र क्रमांक प्रशिक्षण/प्र.क्र.61/2001/39, दिनांक 19/03/2003 प्रमाणे निश्चित केल्यानुसार पोलीस शिपाई पदावर नियुक्ती झाल्याचे दिनांकापासुन 2 वर्षाचे आत प्राप्त करणे आवश्यक राहील. या दोन वर्षाचे कालावधीत त्यांनी विहीत संगणक अर्हता (एमएससीआयटी) प्राप्त केल्याचे प्रमाणपत्र संबंधीत कार्यालयास सादर करावे अन्यथा नियमा नुसाार कार्यावाही करण्यात येईल.

19)उमेदवारांकडुन साक्षांकन नमुन्यातील अनु.क्र.11 (अ) येथे त्याच्या विरूध्द पुर्वी दाखल झालेल्या खटल्याची/गुन्हयाची माहिती दिली जात नाही. यास्तव उमेदवारा विरूध्द या पुर्वी दाखल झालेल्या खटल्याची/गुन्हयाची तपशीलवार माहिती तसेच न्यायालयाने दाखल गुन्हयात दोषमुक्त ठरविले असले तरीही साक्षांकन नमुन्यात माहीती नमुद न केल्याचे निदर्शनास आल्यास तसेच चारित्र्य पडताळणी समाधानकारक आढळुन न आल्यास सदरहू उमेदवारास तात्काळ सेवामुक्त/सेवेतून कमी करण्यात येईल.

20)महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्रमांक बीसीसी–2011/प्र.क्र.1064/2011/16–ब, दिनांक 12/12/2011 व क्रमांक–बीसीसी–2012/प्र.क्र.332/12/16–ब, दिनांक 18/05/2013 चे अन्वये नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर आपले जात प्रमाणपत्राची पडताळणी जात वैधता पडताळणी समितीकडून झाली नसेल, तर आपणास नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासुन सहा महिण्याच्या आत आपली जात प्रमाणपत्राची वैधता पडताळणी संबंधीत जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडुन करून घेवून जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. तरी नियुक्ती स्विकारताच जात वैधता तपासणी करण्यासाठी प्रस्ताव संबंधीत जात पडताळणी समीतीकडे सादर करावा व जात पडताळणी समितीने दिलेल्या पोचपावतीची साक्षांकीत प्रत कार्यालयास सादर करावी. जात पडताळणी समितीने जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर आपणास दिलेले नियुक्ती आदेश त्वरीत रदद करण्यात येईल, आणि आपल्या विरूध्द महाराष्ट्र अनुसूचीत जाती,अनुसूचीत जमाती,विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम 2000 यातील तरतुदीनुसार त्वरीत कारवाई करण्यात येईल.तसेच याचिका क्रमांक 2136/2011 व अन्य याचिकांवर मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिनांक 25/8/2011 रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा.सर्वोच्च न्यायालय,दिल्ली येथे शासनातर्फे एसएलपी दाखल करण्यात आली आहे. यावर मा.सर्वोच्च न्यायालयाकडुन जे काही आदेश दिले जातील त्या आदेशाच्या अधिन राहुन आपली नियुक्ती करण्यात येत आहे.

21) पोलीस शिपाई पदावर नियुक्ती देण्यात आलेले उमेदवार हे कार्यकारी पोलीस दलातील बदलीसाठी पात्र राहणार नाही. मात्र, ते विनंती नुसार जिल्हयाच्या बाहेर फक्त इतर पोलीस घटकात त्याच पदावर बदलीस पात्र राहतील.

# भाग –2 **(रजा,वेतननिश्चती)**

1) **क्रमांक नाजिग्रा/डी– १२/ नि.व.सेनि/२०२४/७११६ नागपूर, दिनांक :– १६/०७/२०२४**

**<u>आ दे श</u>**

खालील नमुद पोलीस अंमलदार यांचे नावासमोर दर्शविल्या प्रमाणे या कार्यालयाचे आदेशानुसार वयाचे ५८ वर्षपुर्ण केल्याने नियत वयोमानाने सेवानिवृत्त करण्यात आले असुन त्यांचे नांव या आस्थापनेवरून कमी करण्यास आले आहे. त्यांचे रजेखाती त्यांचे सेवानिवृत्त दिनांकास नावासमोर दर्शविल्यानुसार अर्जित रजा शिल्लक आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम क्रमांक ६८ व महाराष्ट्र शासन वित्त विभाग निर्णय क्र.अरजा २४०१/८/सेवा–९ दि.१५/०१/२००१अन्वये सदर पोलीस अंमलदार यांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या प्रमाणे त्यांचे रजेखाती शिल्लक असलेले अर्जित रजेचे सममुल्य रजा रोखीकरण मंजुर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | पोलीस कर्मचा–यांचे नांव व हुद्दा | आस्थापनेवरून नांव कमी करण्याचा आदेश क्र व दिनांक . | जन्म तारीख | नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त दिनांक | वेतन व स्तर | रजेखाती शिल्लक असलेल्या अर्जित रजा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रेडपोउपनि/ १०८४ बन्सीलाल हरीलाल धुरीया नेमणुक वाहतुक शाखा | क्र.नाजिग्रा/डी–११/नि.व. सेनि/५७१० दि. २७/०६/२०२४ | २५/०६/१९६६ | ३०/०६/२०२४ | मुळवेतन एस–१० ५२६००/–. | ३०० |
| २ | सफौ/११८२ नागराज जोगोबाजी भोंगाडे नेमणुक पोलीस मुख्यालय | क्र.नाजिग्रा/डी–११/नि.व. सेनि/५७१० दि. २७/०६/२०२४ | ०१/०७/१९६६ | ३०/०६/२०२४ | मुळवेतन एस–१० ५११००/–. | ३०० |

**२) क्रमांक : नाजिग्रा/डी–१३/वेतन सुरु/मसफौं/५६५४/२०२४, नागपूर दिनांक :१८/०७/२०२४**

**— आदेश —**

खालील नमुद पोलीस अंमलदार यांचा या कार्यालयाचे पत्र क्र. नाजिग्रा/डी–१३/वेतन स्थगीत/अ.क्र.१ते ०७/पो.अं./३१७६/२०२४ दिनांक २९/०३/२०२४ अन्वये पगार थांबविण्यात आला होता.

सदरहु नमुद पोलीस अंमलदार हे त्यांचे नावांसमोर दर्शविलेल्या दिनांकास कर्तव्यावर हजर झाल्याने हजर दिनांकापासून त्यांचे स्थगीत असलेले वेतन सुरू करण्यांत येत आहे.

| अ.क्र. | पोलीस स्टेशन/ शाखा चे नाव | पोलीस अंमलदाराचे नाव व बक्कल नंबर | केंव्हा पासुन सिक /गैरहजर आहेत दिनांक | कर्तव्यावर हजर/आजारी दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | पो.स्टे. कन्हान | पोहवा/८७९ उमाशंकर पटेल | १३/०३/२०२४ पासून गैरहजर | दि.१७/०४/२०२४ हजर |

**३)क्रमांक :- नाजिग्रा/ डि-१३ /वार्षीक वे.वा./नापोशि–१०८८/७११५ /२०२४, नागपुर दि.१६-०७-२०२४**

नापोशि/१०८८ महेंद्र जळीतकर नेमणुक पो.स्टे. जलालखेडा हे दिनांक १५/०८/२०२३ रोजी पो.स्टे. कन्हान हद्दीत नागपूर जबलपूर रोडवर चार चाकी गाडी क्र. एम पी–२० बीए. –७८५० व दुचाकी मोटार सायकल क्र. एम एच–४० आर–६५९५ यामध्ये अपघात होवून त्याबाबत गाडी क्र. एम पी–२० बी.ए. ७८५० चा चालक सुनित कुमार सोनवानी यांचे तक्रारीवरुन अप क्र. ५३०/२३ कलम २७९, ३३७,३३८ भादंवी सहकलम मोटार वाहन अधिनियमानुसार दिनांक १०/०८/२०२३ रोजी फिर्यादीला बोलवून स्वत:च्या स्वार्थाकरीता पैशाची मागणी केल्यामुळे अशा प्रकारे बेशिस्तपणाचे वर्तन व बेजबाबदारपणाचे अशोभनिय कृत्य केल्यामुळे या कार्यालयाचे आदेश क्र. नाजिग्रा/डी–१०/सफौ–६४३/पोना–१०८८/सफौ–३६०/विचौ/अंआ./२०२४–३९२० दिनांक २५/०४/२०२४ अन्वये सदर अंमलदारांना **०१ (१) वर्षाकरिता ''पोलीस शिपाई या पदावर पदावनत'' ही शिक्षा अंतिम आदेश देण्यांत आली आहे.** सदर पोलीस अंमलदार यांची खालील प्रमाणे वेतननिश्चीती करण्यांत येत आहे.

**<u>वेतनसंरचना</u>**

| पदनाम | सुधारीत वेतन स्तर |
|---|---|
| पोलीस नाईक | एस—०८ :— २५५००—८११०० |
| पोलीस शिपाई | एस—०७:— २१७००—६९१०० |

**नापोशि/१०८८ महेंद्र जळीतकर पो.स्टे. जलालखेडा**

| वेतनवाढीचा दिनांक | मॅट्रीक्स स्तर | पुर्वीचे वेतन | वेतनवाढीचा दिनांक | वेतन | मॅट्रीक्स स्तर | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १.७.२०२३ | एस—८ | ३२३००/— | २५.०४.२०२४ **पासून** | २९३००/— | एस—७ | आदेश क्र. नाजिग्रा/डी—१०/सफौ —६४३/पोना—१०८८/सफौ—३६०/विचौ/अंआ/२०२४ — ३९२० दिनांक २५/०४/२०२४ आदेशानुसार सदर पोलीस शिपाई यांना एस—७ रु. २९३००/— पासून अनुज्ञेय राहील. |

या कार्यालयाचे आदेश क्र. नाजिग्रा/डी—१०/सफौ—६४३/पोना—१०८८/सफौ—३६०/विचौ/अंआ./२०२४—३९२० दिनांक २५/०४/२०२४ अन्वये सदर अंमलदारांना **०१ (१) वर्षाकरिता ‘‘पोलीस शिपाई या पदावर पदावनत’’ ही शिक्षा अंतिम आदेश देण्यांत आली आहे. दिनांक २५/०४/२०२४ पासून २९३००/—** अनुज्ञेय राहील.

४) **क्र:-नाजिग्रा/डी-9डी / मपोशी /2330 / वाढीव अर्जितरजा /16931/2024 नागपुर दिनांक** 15/07/2024

**आदेश**

खालील नमुद महिला पोलीस अंमलदार यांनी मागितलेली वाढीव अर्जित रजा अमान्य करण्यात येतआहे.

| अ.क्र. | पोलीसअंमलदार यांचे नाव व बक्कल नंबर | नेमणूक | अर्जित रजा |
|---|---|---|---|
| 1 | मपोशी /2330 सारिका विष्णू राठोड | पोलीस मुख्यालय नागपूर ग्रामीण, नागपूर | 15 दिवस वाढीव अर्जित रजा अमान्य. |

5) **क्र:-नाजिग्रा/डी-9डी / चामपोशी-2007 /परिवर्तीत रजा/** 17042/2024 **नागपुर दिनांक** 18/07/2024

**आदेश**

चामपोशी/2007 आचल तिवारी नेमणूक पोलीस मोटार परिवहन विभाग नागपूर ग्रामीण, यांचीखालील नमुद केल्याप्रमाणे महाराष्ट्र नागरी सेवारजा नियम 1981 मधील नियम क्र.50, 61, 63 अन्वये वैदकीय कागदपत्राच्या आधारे रजा मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | दिनांक | दिवस | रजेचा प्रकार | नियम |
|---|---|---|---|---|
| 1 | दि. 16/02/2024 ते दि. 04/03/2024 | 18 | अर्जित रजा | 50 |
| 2 | दि. 05/03/2024 ते दि. 19/03/2024 | 15 | परिवर्तीत रजा | 61 |
| 3 | दि. 20/03/2024 ते दि. 05/04/2024 | 17 | असाधारण रजा | 63 |

6)**क्र:-नाजिग्रा/डी-9डी /चापोशी-2080/परिवर्तीत रजा /17043/2024 नागपुर दिनांक** 18/07/2024

**आदेश**

चापोशी 2080/ललीतकुमार छगनलाल ठाकूर ,नेमणूक पोलीस मोटार परिवहन विभाग नागपूर ग्रामीण, यांचीखालील नमुद केल्याप्रमाणे महाराष्ट्र नागरी सेवारजा नियम 1981 मधील नियम क्र.50, 61,63 अन्वये वैदकीय कागदपत्राच्या आधारे रजा मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | दिनांक | दिवस | रजेचा प्रकार | नियम |
|---|---|---|---|---|
| 1 | दि. 25/02/2024 ते दि. 13/03/2024 | 18 | अर्जित रजा | 50 |
| 2 | दि. 14/03/2024 ते दि. 28/03/2024 | 15 | परिवर्तीत रजा | 61 |
| 3 | दि.29/03/2024 ते दि. 08/04/2024 | 11 | असाधारण रजा | 63 |

7)**क्र:-नाजिग्रा/डी-9डी / नापोशि-2148/वेतन स्थगित / 1162963/2024 नागपुर दिनांक** 15/07/2024

**आदेश**

खालील नमुद पोलीस अंमलदार हे कर्तव्यावर अनधिकृतपणे गैरहजर असल्याने त्यांचे माहे 07/2024 पासून पुढील आदेशापर्यंत तात्पुरते वेतन स्थगित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पोलीस अंमलदार यांचे नाव व बक्कल नंबर | नेमणूक | केव्हापासून गैरहजर |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | नापोशि/2148 कांतिलाल काकोडे | पोस्टे कुही | दि.20/04/2024 |

**8)कमांक : नाजिग्रा / डी–13 / वेतन सुरु / मसफौं / 25569 / 2024, नागपूर दिनांक : 15 / 07 / 2024**

**– आदेश –**

सदरहु नमुद पोलीस अंमलदार हे त्यांचे नावांसमोर दर्षविलेल्या दिनांकास कर्तव्यावर हजर झाल्याने हजर दिनांकापासून त्यांचे स्थगीत असलेले वेतन सुरू करण्यांत येत आहे.

| अ.क्र. | पोलीस स्टेशन/ शाखा चे नाव | पोलीस अंमलदाराचे नाव व बक्कल नंबर | केंव्हा पासुन सिक /गैरहजर आहेत दिनांक |
|---|---|---|---|
| 1 | मसफौ / 1093 प्रतिभा तेलगोटे | पो.स्टे.देवलापार | 04 / 05 / 2024 पासुन सिक रजेवर |

**9)क्रः—नाजिग्रा/डी—१३/मपोअं/प्रसुतीरजा/२५५४३/२०२४ नागपुर दिनांक १५/०७/२०२४**

<u>आदेश</u>

, खालील नमुद महिला पोलीस कर्मचा—यांना शासन निर्णय वित्त विभाग क्र. अरजा—१४०९/प्र.क्र .०८/०९ सेवा—६, दिनांक २४.८.२००९ अन्वये रजेवर सोडल्याचे दिनांकापासून १८० दिवस पहिली प्रसुती रजा मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र | महिला पो अमलदाराचे नांव व हुददा व ब.नं | नेमणुक | प्रसुतीची संभाव्य दिनांक |
|---|---|---|---|
| १ | मपोशि/११३२ प्रतिक्षा संतोष निम्बर्ते | पो.स्टे. कळमेश्वर | दिनांक १०/०९/२०२४ |

10)क्रमांकःपोअ / नाजिग्रा / डी–4 / पोलीस अधिकारी / अर्जित रजा / 24–25 / 7148 नागपुर दि. 16 / 07 / 2024

———::आदेश::———

महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियमावली 1981 च्या नियम 50 च्या तरतुदीनुसार खालील नमुद पोलीस उपनिरीक्षक यांना त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे मुख्यालय सोउण्याचे परवानगीसह अर्जित रजा मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पोलीस अधिका—यांचे पदनाम व नाव | नेमणुक | रजा मागण्याचे कारण | मंजुर रजा कालावधी |
|---|---|---|---|---|
| 1 | पोनि. श्री. राजेंद्र निकम | पोलीस नियंत्रण कक्ष नागपुर ग्रामीण | सासु मरण पावल्याने | दि. 16 / 07 / 2024 ते 30 / 07 / 2024 पर्यंत 15 दिवस अर्जित रजा मुख्यालय सोडण्याची परवाणगी सह |

11)**कमांकः-नाजिग्रा / डी-13/अतिप्रदान / पोलीस अंमलदार** - 1464 / 7141/ 2024, **नागपुर दिनांक** 16-07-2024

**आदेश**

पोलीस अंमलदार/1464 प्रमोद वासुदेव गवरे नेमणुक पोलीस स्टेशन सावनेर, हे दिनांक 31/08/2024 रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणार असुन त्यांचे सेवापटात वेतन पडताळणी पथक नागपुर यांनी आक्षेप घेतल्याने त्यानुसार सुधारीत वेतन निश्चिती देण्यात आली असल्याने त्यांना मुळवेतनातील फरकाची अतिप्रदान झालेली रक्कम रु 22,493 /- (अक्षरी रुपये बावीस हजार चारशे त्र्यान्नव फक्त) ही ) ही त्यांना मिळणा-या सेवानिवृत्त उपदानातुन वसुल करण्यात यावे वं शासन जमा करण्यात यावे.

# भाग –3 (कसुरी,शिक्षा)

**१)क्रमांक :—नाजिग्रा/डी—१०/निलंबिन मुक्त/आढावा/माहे—जुन/५६५२/२०२४— दिनांक १८.०७.२०२४**

**आ दे श**

पोलीस अधिक्षक, नागपुर जिल्हा ग्रामिण, नागपुर आस्थापनेवरील गठीत करण्यात आलेल्या निलंबन आढावा समीतीने **दिनांक १८/०६/२०२४** रोजी निलंबित असलेल्या सर्व पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचे निलंबनाचा आढावा घेतला असता त्यामध्ये पोलीस महासंचालक, म.रा. मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक पोमसं/११/२२/६/२५२, दिनांक १४/६/२०१९ व सामान्य प्रशासन विभाग यांचे शासन निर्णय क्रमांक निप्रअ/१११८/प्र.क्र.११/११अ, दिनांक ९ जुलै २०१९ मध्ये दिलेल्या मार्गदर्शक सूचना प्रमाणे निलंबित असलेल्या खालील नमुद पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना त्यांच्या विरूध्द सुरू असलेल्या न्यायालयीन कार्यवाहीचा अंतिम निर्णयाच्या आधीन राहुन त्यांना निलंबनातुन मुक्त करण्याचे निर्देश असल्याने त्यांना निलंबनातुन मुक्त करून ते कर्तव्यावर हजर झाल्याचे तारखेपासुन त्यांची नेमणुक खालील प्रमाणे करण्यात येत आहे. तसेच त्यांचे निलंबन कालावधीबाबतचा निर्णय त्यांचे विरूध्द सुरू असलेल्या न्यायालयीन प्रकरणाचा निर्णय झाल्यानंतर घेण्यात येईल.

| अ.क्र. | निलंबित पोअधि./कर्म./ | निलंबनातुन मुक्त केल्यानंतर नेमणुकीचे ठिकाण |
|---|---|---|
| १ | सफौ/१६२७ प्रशांत केसरे | पोलीस मुख्यालय, नागपूर ग्रामीण |

# भाग–4 (बक्षिस आदेश)

निरंक

# भाग –5 (प्रशिक्षण,परवानगी,अग्रीम)

1) क्रमांक : नाजिग्रा/डी–9(अ)/**INSTALLATION SECURITY COURSE-10/**2024/13321,नागपुर, दिनांक /06/2024

–: आ दे श :–

संचालक, आणि विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र इंटेलिजन्स ॲकेडमी (MIA) पुणे यांचेकडील बिनतारी संदेश क्रमांक MIA/TRG/MAY/INSTALLATION SECURITY COURSE- 10 /PUNE/2970**,**दिनांक 07/06/2024 अन्वये दिनांक 19.06.. 2024 ते 22.06..2024 पर्यंत 4 दिवस “INSTALLATION SECURITY COURSE- 10”प्रशिक्षण सत्र 10/24 महाराष्ट्र इंटेलिजन्स ॲकेडमी, रारापोबल गट क्र.1,रामटेकडी, (MIA) पुणे येथे आयोजित केले असुन सदर प्रशिक्षणाकरीता या घटकातुन महिला पोहवा/1700 संगिता शामराव क्षिरसागर,नेमणुक, पोलीस मुख्यालय, नागपुर (ग्रामीण),नागपुर.(सलग्न लेखा शाखा,रोखपाल ब्रॅन्च) यांची निवड करून पाठविण्यात येत आहे.

**२) क्रमांक : नाजिग्रा/डी-९( अ) / BDDS BASIC COURSE .०८/२०२४, ७०९८ नागपुर दि १५/०७/२०२४**

–: आ दे श :–

संचालक,आणि विषेष पोलीस महानिरीक्षक,महाराष्ट्र इंटेलिजन्स ॲकेडमी (MIA)पुणे यांचेकडील बिनतारी संदेश क्रमांक MIA/TRG/JUN/BDDS BASIC COURSE NO.086/24/PUNE/3395, **दिनांक 01.07. 2024** अन्वये दिनांक 29**.07..2024 ते 13.08.2024 पर्यंत 16 दिवस** “BDDS BASIC COURSE NO.08 प्रषिक्षण **सत्र 08/24** महाराष्ट्र इंटेलिजन्स ॲकेडमी, रारापोबल गट क्र.1,रामटेकडी,(MIA) पुणे येथे आयोजित केले असुन सदर प्रषिक्षणाकरीता **पोशि/1511 हिमांशु इंगोले ,**पोलीस मुख्यालय, नागपुर ग्रामीण यांचे सेवेचे 03 वर्ष पुर्ण न झाल्याने यांचे ऐवजी पोषि /798 अषिवन मधुकर गजभिये नेमणु पोलीस स्टेषन कन्हान यांची निवड करून पाठविण्यात येत आहे.

3) **क्र:-नाजिग्रा/डी-9डी /पोशी/2036/परिक्षा परवानगी/16929/2024 नागपुर दिनांक** 15/05 /2024

**आदेश**

खालील नमुद पोलीस अंमलदार यांना खालील नमुद अटीप्रमाणे राज्यसेवा पूर्व परीक्षा 2024 गट-अ च्या परिक्षेला बसण्याचीपरवानगीदेण्यात येत आहे.

| अ.क्र | पोलीस अंमलदारांचे नांव हुददा | नेमणुक | परिक्षाकरिता मागीतलेली परवानगी |
|---|---|---|---|
| 1 | पोशी/2036बळीराम बाबासाहेब भोजने . | पोलीस मुख्यालय | राज्यसेवा पूर्व परीक्षा 2024 गट-अ |

**अटी:-**

1) शासकीय कामात व्यत्यय होणार नाही.
2) परिक्षेच्या पुर्व तयारी करीता रजा देणे बंधनकारक राहणार नाही.
3) परिक्षेकरीता रजा घ्यावी लागेल
4) निकडीचे वेळी परिक्षा परवानगी रदद करण्यांत येईल.

Signed by Umesh Ghaninath Funde
Date: 10-11-2024 22:37:35

(उमेश फुंदे)
कार्यालय अधिक्षक
पोलीस अधीक्षक,कार्यालय
नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर

प्रति,

सर्व ठाणेदार/रापोनि.मुख्या./बि.संदेश/जि.वि.शा/नियं.कक्ष/स्था.गु.शा./मो.प.वि./पो.अधि.वा.शाखा/अ.पो.अधि.वा.शाखा/म.त.नि /कार्या.अधिक्षक/डी–4/डी–7/डी–9बी/डी–11/डी–12/डी–13/लघुलेखक/वे.नि.लपीक/कल्याणशाखा/सुरक्षाशाखा / वाहतुक शाखा ना.ग्रा.

प्रत सस्नेह अग्रेषित :– अ.पो.अधि.नाग्रा/महामार्ग सूरक्षा पथक/नागरी हक्क संरक्षण केंद्र.

प्रतिलिपी :– पो.उप अधि.(गृह) व सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी ना.ग्र. यांना आवश्यक कार्यवाहीस

2/– सदरची मराठी साप्ताहीक पोलीस पत्रिका ही रोलकॉलवर वाचून दाखविण्यात यावी व संबंधितास समज देऊन त्यांचा नावापूढे त्यांची स्वाक्षरी घेण्यात यावी.